हडपसर पोलीस स्टेशन गु.र.क्र.३०५/२०१४ (मोहसीन मो.सादीक शेख हत्या प्रकरण) मधून उद्भवणा-या सत्र न्यायालयातील प्रकरणाचे काम पाहण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री.उज्वल निकम यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी २०१४/प्र.क्र.२१८/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ : १. शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्र.एसपीपी ३११४/ए.एस.८३/डी-१४, दिनांक २५ ऑगस्ट, २०१४
२. शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्र.एसपीपी ३११४/ए.एस.८३/डी-१४, दिनांक १९ मे, २०१७

शासन निर्णय:

हडपसर पो.स्टे.गु.र.नं ३०५/२०१४ (मोहसीन मो.सादीक शेख हत्या प्रकरण) मधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणी सत्र न्यायालयातील सर्व प्रकरणाचे शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री.उज्वल निकम यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ च्या अधीसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, काही व्यक्तीगत कारणांमुळे सदर नियुक्ती रद्द करण्याबाबत ॲड श्री. उज्वल निकम यांनी त्यांच्या दिनांक २१.०४.२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली होती. त्यास अनुसरून विधि व न्याय विभागाने संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९.०५.२०१७ च्या अधिसुचनेन्वये ॲड उज्वल निकम यांची नियुक्ती रद्द केलेली आहे. ही बाब विचारात घेता दिनांक २५.०८.२०१४ ते १९.०५.२०१७ या कालावधीतील शासनाचे दायीत्व लक्षात घेता, ॲड.श्री.उज्वल निकम यांना दिनांक २५.०८.२०१४ ते १९.०५.२०१७ या कालावधीकरीता खालीलप्रमाणे व्यवसायीक फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी	-	रू .३०,०००-/
ब) विचारविनिमय फी (प्रतितास) (कमाल मर्यादा प्रतिदिन रु.३०,०००/-)	-	रू. ८,०००/-
क) हॉटेल लॉजिंग बोर्डिंग (प्रतिदिन)	-	रु. ५,०००/-

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.उज्वल निकम यांना, वरीलप्रमाणे फी दर, हे दिनांक २५.०८.२०१४ ते १९.०५.२०१७ या कालावधीतील प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणापुरतेच अनुज्ञेय राहतील. उपरोक्त नमुद फी व्यतिरिक्त अपरिणामकारक सुनावणी फी, अथवा इतर कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत .

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६९/२०१७/व्यय-७, दिनांक ०५.१०.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६१६२५०८७९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2017.10.26 16:15:08 +05'30'

(किशोर शा.भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, पुणे.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. कोषागार अधिकारी, पुणे.
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री.उज्वल निकम, बॅरिस्टर निकम चौक, ४८, रामदास कॉलनी, जळगाव, जि. जळगाव.
७. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई. / ९. निवड नस्ती (पोल-१०).